MHSN150055212020

नि.दि.मु.क्र.५३०/२०२० मधील
(दाजी सावंत वगैरे वि. नाना सावंत वगैरे)

## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ५३०/२०२० मधील निशाण ८५ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. उभयपक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी क्र.२ यांचे अर्जातील कथनांप्रमाणे वादी क्र.१ दाजी मारुती सावंत हे दि.२१.०५.२०२१ रोजी जाधववाडी (ढोराळे) येथे मयत झाले आहेत. परंतु, वादी क्र.२ यांना मयत पक्षकार यांचे वारस मुदतीत अभिलेखावर आणावयाचे असतात, या कायदेशीर तरतुदीचे ज्ञान नसलेने व दरम्यानचे काळात कोरोना प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन असलेने त्यांना वादी क्र.१ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत. त्यामुळे, त्यांचे विरुध्द वादी क्र.१ यांचे बाबत दावा तांत्रिकदृष्टया अबेट झाला आहे. प्रतिवादी यांनी अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, वादी क्र.२ यांनी ही कथने अर्जाचे पुष्ट्यर्थ ॲफिडेव्हीट सादर करुन शपथेवर केली आहेत. कायद्याचे ज्ञान प्रत्येक नागरिकाला असते, असे गृहितक असले तरी सामान्य पक्षकाराला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील प्रक्रियेची माहिती असते, असे म्हणता येणार नाही. तसेच, दरम्यानचे कालावधीमध्ये कोरोना महामारीमुळे लॉकडाऊन होता, ही बाब खरी आहे. त्यामुळे, वादी यांनी दिलेले कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी हा दावा निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप पाहता वादी क्र.१ यांचे वारसांकरीता दाव्याचे कारण पुढे चालू राहते. सबब, या कामी वादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. त्याकरीता वादी यांचेविरुध्द वादी क्र.१ यांचेबाबत तांत्रिकदृष्ट्या झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः

*MHSN150055212020*

नि.दि.मु.क्र.५३०/२०२० मधील
(दाजी सावंत वगैरे वि. नाना सावंत वगैरे)

**आ दे श**

१. वादी क्र.२ यांचा निशाण ८५ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. मयत वादी क्र.१ यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे वादी यांचेविरुध्द वादी क्र.१ यांचेबाबत तांत्रिकदृष्ट्या झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत येत आहे.

-

Sd/-

**दिनांक १६.०२.२०२२** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः विटा.** **३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,**
**ता. खानापूर, जि.सांगली.**

Case No : RCS. No. 530 of 2020
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Typist : D.R.Kamble,
Court Name: 3rd Joint Civil & Criminal Court, Vita, Dist.Sangli.
Date of decision : 16.02.2022
Order signed by P.O.on : 16.02.2022
Order uploaded on : 17.02.2022